# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

रिझर्व्ह बँक लवकरच दहा आणि पाचशे रुपयांच्या नवीन नोटा जारी करणार आहे. त्यावर रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची स्वाक्षरी असेल. या नोटांची रचना महात्मा गांधींचा फोटो असलेल्या नवीन मालिकेतील दहा आणि पाचशे रुपयांच्या नोटांसारखी असेल. रिझर्व्ह बँकेने आधीच जारी केलेल्या १०० आणि ५०० रुपयांच्या नोटा चलनात राहतील, असं या वृत्तात म्हटलं आहे.

****

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या वतीनं "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" सुरु करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थींना आता सहा महिन्यांऐवजी ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरीत होईल. १० मार्च २०२५ पूर्वी सहा महिन्याचं प्रशिक्षण पूर्ण केलं असेल, अशा प्रशिक्षणार्थींनी तसंच नवीन इच्छुक उमेदवारांनी www.cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील प्रतिज्ञापत्राचा नमुना संबंधित सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे यांच्याकडे सादर करावेत, असं आवाहन या विभागानं केलं आहे.

****

लातूर शहरातील गंजगोलाई भागात एका जीर्ण झालेल्या इमारतीचा काही भाग अचानक कोसळून ढिगाऱ्याखाली एक ऑटो आणि दोन दुचाकी अडकल्या. आज ही दुर्घटना घडली. सुदैवानं यात कसलीही जीवितहानी झाली नाही. जवळपास ७० ते ८० वर्षे जुनी ही इमारत होती. लातूर महापालिकेनं या ठिकाणी पडलेला ढिगारा तात्काळ साफ केल्यामुळं खोळंबलेली वाहतूक पूर्ववत झाली.

****

दरम्यान, गंजगोलाई भागातील साळे गल्लीच्या रस्त्यावर काल रात्री झालेल्या आयशर टेम्पो आणि दुचाकीच्या अपघातात एका २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. आर्यन गायकवाड असं त्याचं नाव आहे. पोलिसांनी टेम्पोसह चालकाला ताब्यात घेतलं असून गंजगोलाई सारख्या गजबजलेल्या ठिकाणी दिवसा मोठ्या मालवाहू गाड्या सोडू नयेत अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

****

अकोला जिल्ह्यातील भूमीअभिलेख विभागात मोजणी आणि विविध प्रकारची कामं जलदगतीनं मार्गी लागावी, यासाठी 'भूप्रणाम केंद्र' काल सुरु करण्यात आलं असून आता नागरिकांची कामं ऑनलाइन स्वरूपात मार्गी लागणार आहेत. नागरिकांना जमीन व्यवहारासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या कागदपत्रांची आवश्यकता असते. भूमी अभिलेख विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध कागदपत्रांसाठी नागरिकांना कार्यालयात अनेकदा जावं लागतं, काहीवेळा या कार्यालयांमध्ये कामाला विलंब होतो आणि अनेकदा कामांसाठी जादा पैसे घेतल्याचा आरोपही होतो. या सर्व बाबी टाळण्यासाठी हे भूप्रणाम केंद्र सुरु करण्यात आलं असल्याचं अकोला भूमी अभिलेख कार्यालयाच्या वतीनं सांगण्यात आलं आहे.

****

मध्य रेल्वे विभागानं उन्हाळी हंगामात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन प्रवासांसाठी आपल्या नियमित गाड्यांव्यतिरिक्त १ हजार १५६ उन्हाळी विशेष गाड्यांच्या सेवा जाहीर केल्या आहेत. यात २८४ अनारक्षित रेल्वेगाड्यांचा समावेश आहे. मध्य रेल्वेनं यापूर्वी उन्हाळी विशेष गाड्यांच्या १ हजार ५८ सेवांची घोषणा केली होती आणि आता अतिरिक्त ९८ रेल्वेगाड्या सेवा जाहीर केल्या आहेत.
या ९८ रेल्वेगाड्यांमध्ये मुंबई– मडगाव, कानपूर आणि पुणे – झांसी तसंच कलबुर्गी –बेंगळुरू दरम्यान धावणाऱ्या रेल्वेगाड्यांचा समावेश आहे. मुंबई–सांकराईल दरम्यान सहा अनारक्षित विशेष रेल्वेगाड्या असतील.

****

भंडारा जिल्ह्यातल्या साकोली इथल्या सिव्हिल वॉर्डात शॉर्टसर्किटमुळे गोठ्यात आग लागून ७ म्हशी होरपळून ठार झाल्या तर ३ म्हशी गंभीर भाजल्या आहेत. शेतकरी भास्कर लांजेवार यांच्या गोठ्यावरून गेलेल्या विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट झाल्यानंतर गोठ्यातील तणसीनं पेट घेतल्यानं ही दुर्घटना घडली. महावितरणने लांजेवार यांना आर्थिक नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

****

ब्राझीलमध्ये सुरु असलेल्या मुष्ठीयुद्ध विश्वचषक स्पर्धेत भारताच्या अभिनाश जामवालनं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. जामवालनं काल रात्री इटलीच्या जियानलुइगी मालुंगाचा पाच विरुद्ध शुन्य असा पराभव केला. आज अंतिम फेरीत जामवालचा सामना ब्राझीलच्या युरी रीसशी होईल. दरम्यान, ७० किलो वजनी गटातील अंतिम सामना भारताचा हितेश आणि इंग्लंडचा ओडेल कामारा यांच्यात होईल. गुरुवारी झालेल्या उपांत्य फेरीत हितेशनं फ्रान्सच्या माकन त्राओरवर पाच विरुद्ध शुन्य असा शानदार विजय मिळवला होता. यापूर्वी, मनीष राठोडनं ५५ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकलं आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नईत, चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांत दुपारी साडेतीन वाजता तर चंदीगड इथं राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्ज या संघांमध्ये सायंकाळी साडेसात वाजता सामना होईल.

****